# प्रेस नोट

**विषय:- जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत.**

जिल्हापरिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक -२०२५ चे अनुशंगाने महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. जिपनि-२०२५/प्र.क्र.२०/का.७, दि.२३/०९/२०२५ अन्वये जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकासाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. सदर कार्यक्रमाचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १ | निवडणूक विभाग गणनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | दि.०८/१०/२०२५ |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | दि.१४/१०/२०२५ |
| ३ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे | दि.२७/१०/२०२५ |
| ४ | मतदान केंद्राची व मतदान केंद्रनिहाय यादी प्रसिध्द करणे | दि.२७/१०/२०२५ |

सदर आदेशात दिलेल्या सुचनेनुसार निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी सातारा जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयामध्ये त्या तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील पंचायत समिती मधील ज्या त्या गट व गणनिहाय यादी दि.०८/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करणेत येणार आहे.

तसेच, दि.०८/१०/२०२५ रोजीपासून गट व गणनिहाय प्रारुप मतदार याद्या कार्यालयीन वेळेत तहसिलदार कार्यालयामध्ये सर्व सर्वसामान्यांना पहावयास उपलब्ध केलेल्या आहेत. सदर प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी दि.०८/१०/२०२५ ते दि.१४/१०/२०२५ रोजीपर्यंत असून कार्यालयीन वेळेत सर्व तहसिलदार कार्यालयात हरकती स्वीकारण्यात येतील,

Chavan

**(विक्रांत चव्हाण)**
**उपजिल्हाधिकारी (महसूल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय सातारा**